बुक-पोस्ट

श्री./श्रीमती

प्रेषक :-
अमर हिंद मंडळ, दादर,
गोखले पथ ( उत्तर ),
दादर, मुंबई-४०० ०२८.

एकविरा प्रिंटर्स, ३९, ज्ञान मंदिर रोड, गोखले रोड (नॉर्थ), दादर, मुंबई-२८.

# अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई

[ स्थापना १९४७ ]

[ रजि. नं. १७८६/२५-६-१९४९ ]

# त्रैवार्षिक अहवाल

## १ जानेवारी १९७८ ते ३१ डिसेंबर १९८०

★

अमरवाडी,
गोखले पथ, [ उत्तर ],
दादर, मुंबई-४०० ०२८.

# अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई

(स्थापना १९४७)

## : विश्वस्त :

| | |
|---|---|
| खासदार | : बॅ. विठ्ठलराव गाडगीळ |
| | डॉ. ग. स. साळवी |
| | श्री. गो. ना. वैद्य |
| | ,, ना. के. पडते |
| | ,, मा. गो. बालक |
| अध्यक्ष खासदार | : बॅ. विठ्ठलराव गाडगीळ |
| उपाध्यक्ष | : डॉ. गो. ह. नेरुरकर |
| | : श्री. शि. धों. वेलणकर |

## १९८० ते १९८२ ची कार्यकारी समिती

| | |
|---|---|
| कार्याध्यक्ष | : श्री. मु. आ. तिवरेकर |
| कार्योपाध्यक्ष | : डॉ. सुहास द. कुलकर्णी |
| कार्यवाह | : श्री. न. ज. मयेकर |
| संयुक्त कार्यवाह | : श्री. श्रीधर का. भोसले |
| कोषाध्यक्ष | : श्री. पां. गं. वेलणकर |

## : सभासद :

| | |
|---|---|
| श्री. ना. के. पडते | श्री. ना. रा. नाबर |
| श्री. हरिश्चंद्र गं. राणे | श्री. दि. शं. पाटील |
| श्री गो. स. आवसक | श्री. उ. व्यं. शेणॉय |
| श्री. पां. वि. पाटील | श्री. अ. वि. गाडगीळ |
| श्री. म. र. कुपेरकर | श्री. दि. आ. पालेकर |

Secretary
AMAR HIND MANDAL

# अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई

## — वार्षिक सर्वसाधारण सभा —

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २४-१-८२ रोजी सकाळी ९-३० वाजता मंडळाच्या सभागृहात मंडळाचे अध्यक्ष खासदार **बॅ. विठ्ठलराव गाडगीळ** यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे. गण संखेच्या अभावी सभा तहकूब झाल्यास घटना नियमानुसार त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरू होईल.

**सभेपुढील कामे**

१) मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजुर करणे.
२) त्रैवार्षिक अहवाल वाचून मंजूर करणे.
३) १ जानेवारी १९७८ ते ३१ डिसेंबर १९८० अखेरचे हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.
४) सन १९८१ सालासाठी हिशेब तपासनिस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५) नवीन बांधकाम योजनेसंबंधी कार्यकारी समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
६) पुढील सहा वर्षाकरिता तीन विश्वस्तांची निवड करणे.
७) अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**सूचना :—**

१) प्रचलित घटना नियमांनुसार विश्वस्तांच्या निवडणूकीसाठी भरावयाचे अर्ज मंडळाचे कचेरीत दिनांक १८-१-८२ रोजी रात्रौ ८ वाजेपर्यंत स्विकारले जातील.
२) निवडणूक सुरू होण्यापूर्वी उमेदवारींचा अर्ज मागे घेता येईल.
३) ज्या सभासदांना हिशेबाविषयी माहिती पाहिजे असेल त्यांना ती कचेरीच्या वेळांत दिनांक २०-१-८२ पर्यंत मिळेल.
४) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी ते लेखी दिनांक २०-१-८२ पर्यंत मंडळाच्या कार्यालयात कचेरीच्या वेळांत आणून द्यावेत.

कार्यकारी समितीच्या संमतीने
आपला
**न. ज. मयेकर**
कार्यवाह

# त्रैवार्षिक अहवाल

( १-१-१९७८ ते ३१-१२-१९८१ )

**सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,**

मंडळाच्या १९७८, १९७९ आणि १९८० या तीन वर्षाच्या काळातील कार्याचा हा त्रोटक अहवाल आपणास सादर करताना आम्हास आनंद होत आहे.

आपल्या सध्याच्या कार्यकारी समितीकडे मार्च १९८० मध्ये मंडळाच्या कार्याची जबाबदारी आली. त्यानंतर मंडळाच्या दैनंदिन कामाव्यतिरिक्त, मंडळाचे १९७८ व १९७९ या दोन वर्षांचे हिशेब तयार करून ते तपासून घेण्याचे काम त्वरित पूर्ण करण्याच्या दृष्टीने, कार्यकारी समितीने सतत प्रयत्न केले. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पूर्वी १९८० सालचेही हिशेब पूर्ण करून तपासून घेण्यात आलेले आहेत. या कामाला विलंब झाला आणि त्यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभेलाही थोडा विलंब झाला, ह्याची आम्हास जाणीव आहे पुढील वार्षिक सभेला असा विलंब होणार नाही ह्याची दक्षता आम्ही अवश्य घेऊ.

१९७८ व १९७९ या दोन वर्षाच्या काळांतील मंडळाचे कार्य विशेष प्रभावीपणे होऊ शकले नाही. मंडळाच्या आर्थिक व्यवहारातही उल्लेखनीय अशी प्रगती होऊ शकली

नाही. वार्षिक वसंतव्याख्यानमाला, व्यायामशाळा व मंडळाच्या सभागृहात होणाऱ्या नागरिकांच्या कार्यक्रमां व्यतिरिक्त अन्य विशेष कार्य होऊ शकले नाही. श्री. राजाभाऊ शेटये ह्यांचा मंडळावरील कायदेशीर दावा आणि त्यामुळे मंडळाच्या कार्यात / कारभारात निर्माण झालेल्या अडचणी व आर्थिक ताण य मुळे मंडळाच्या कार्यावरती अनिष्ट परिणाम झाला. मंडळाचा महत्त्वाचा वार्षिक वसंतव्याख्यानमालेचा कार्यक्रमही प्रयत्न करूनसुद्धा आर्थिकदृष्ट्या तोट्याचाच झाला मंडळाची इमारत, सभागृह, व्यायामशाळा तसेच खेळायचे मैदान ह्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी ही मंडळास बराच खर्च करणे भाग पडले.

१९७८ व १९७९ या दोन वर्षाच्या काळात कार्यकारी समितीच्या एकुण १३ सभा झाल्या, मंडळाच्या कार्यकारी समितीच्या सभासदांसह विश्वस्तांच्या २ सभा झाल्या. कार्यकारी समितीच्या सभांना समाधानकारक उपस्थिती होती. विश्वस्तांच्या सभाना मात्र उपस्थिती समाधानकारक नव्हती.

**वरील दोन वर्षांच्या काळत एकूण ६ सभासद झाले**

१९७८ साली दिनांक २२।४।७८ ते ३०।४।७८ पर्यंत वसंत व्याख्यानमालेचा कार्यक्रम झाला एकूण १९ व्याख्यात्यानी सदर व्याख्यानमालेत सहभागी होऊन सहकार्य केले. १९७९ साली दिनांक १४।४।७९ ते २४।४।७९ पर्यंत वसंत व्याख्यानमालेचा कार्यक्रम झाला. एकूण १२ व्याख्यात्यानी या व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात भाग घेतला होता. व्याख्यानमालांचे हे दोन्हीही कार्यक्रम आर्थिक दृष्टीने नसले तरी बौद्धिक, शैक्षणिक व मनोरंजनाच्या दृष्टीने यशस्वी झाले.

नवीन बांधकाम योजनेसंबंधी कार्यकारी समितीने तीन चार योजना विचारांत घेतल्या. शेवटी सारस्वत बँकेकडून कर्ज घेऊन बांधकाम योजना पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. आर्किटेक्ट श्री. **हरचेकर** यांना नवीन बांधकाम योजनेचा आराखडा ( Plan ) तयार करण्याची विनंती करण्यात आली. विश्वस्तांच्या सभेत सदर योजनेस सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.



मेसर्स श्री. **रामनाथ पै** ह्यांच्याशी कॅटरींगचा करारनामा करण्यात आला.

मंडळाच्या परिछेद घटना नियमामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या सुचवून त्यांस वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूरी घ्यावी असे ठरले.

मंडळाचे कागदपत्र वार्षिक सभेसाठी आवश्यक असल्यामुळे ते कोर्टातून लवकरात लवकर मिळविण्याचा प्रयत्न मंडळांचे वकील श्री. **दामले** ह्यांच्याकडून करण्यात आला.

मंडळाचे माजी कार्यवाह श्री. **ना. के. पडते** हे विशेष दंडाधिकारी झाल्याबद्दल कार्यकारी समितीच्या सभेत त्यांचे अभिनंदन करण्यात आले व वार्षिक सभेतही त्यांचा सत्कार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मंडळाचे माजी कायाध्यक्ष ॲडव्होकेट श्री. **डी. व्ही. जावळे** ह्यांच्या निधनाबद्दल कार्यकारी समितीने दुःख व्यक्त केले व त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

मंडळाचे कार्याध्यक्ष व विश्वस्त श्री. **मा. गो. बालक** यांच्याकडून मंडळाने घेतलेली कर्जाऊ रकम १९५३९/– रु. १२ टक्के व्याजासह परत करण्याची जबाबदारी स्विकारण्याचा निर्णय कार्यकारी समितीने घेतला.

१६ मार्च १९८० रोजी झालेल्या मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर जुन्या कार्यकारी समितीची व नवीन समितीवर निवडून आलेल्या नवीन सभासदांची संयुक्त सभा दिनांक २३।३।१९८० रोजी झाली, सदर सभेत नवीन समितीवरील नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

वर्षभरात कार्यकारी समितीच्या १२ व विश्वस्तांबरोबर १ अशा एकूण १३ सभा झाल्या सर्व सभांना चांगली उपस्थिती होती. गणसंख्येच्या अभावी एकही सभा तहकूब करण्याचा प्रसंग आला नाही.

१९७८ व १९७९ ह्या सालांचे वार्षिक हिशेब पूर्ण करुन तपासून घेणे मंडळाचे सभासद / खेळाडू सभासद वाढविणे मंडळाच्या कामकाजात वक्तशीरपणा व नियमितपणा

आणणे, मंडळाच्या व्यवहारात आर्थिक दृष्ट्या प्रगती साधण्यासाठी प्रयत्न करणे तसेच मंडळाच्या इमारतीची डागडुजी करणे, मंडळाच्या सभागृहात, खेळाच्या मैदानात, व्यायामशाळेच्या जागेत तातडीने आवश्यक ती सुधारणा करणे यासाठी कार्यकारी समितीने उत्साहाने व सातत्याने प्रयत्न केले.

वर्षभरात मंडळाचे खालील प्रमाणे सभासद झाले तहहयात सभासद १५ सभासद सर्वसाधारण सभासद १८ खेळाडू सभासद ५७.

व्यायामशाळा व खेळ हे मंडळाचे मूळ उद्देश लक्षात घेऊन समितीने सुरुवातीलाच ह्याबाबतीत विशेष लक्ष घातले, ह्यासाठी मंडळाचे संयुक्त कार्यवाह श्री. **श्री. का. भोसले** व कार्यकारी समितीचे सभासद व क्रीडा क्षेत्रातील यशस्वी कार्यकर्ते **श्री. उमेश शेणॉय** ह्यांची एक खास क्रीडा समिती नियुक्त करण्यात आली. खेळांच्या मैदानाची साफसफाई व पुर्नरचना करण्यात आली. तसेच दैनंदिन देखभालीचीही विशेष व्यवस्था करण्यात आली व्यायाम शाळेच्या जागेतही आवश्यक ती डागडुजी व व्यायाम करण्यासाठी स्वच्छ जागेची सुविधा आणि अन्य सोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या. खेळाडू सभासदांची आर्थिक अडचण लक्षांत घेऊन त्यांना सभासद वर्गणीच्या बाबतीत पूर्ण सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

देशी खेळांना खास प्रोत्साहन देणे हे मंडळाचे एक मुख्य ध्येय आहे व ह्या ध्येयाच्या अनुषंगाने खेळाच्या मैदानाची साफसफाई, सुधारणा व विशेष देखभाल करण्यात येते. खेळाडू मुलां-मुलींना सर्वतोपरी सोयी सवलती देण्यात येतात. ह्यामुळे मंडळाच्या मैदानात रोजच मुले–मुली निरनिराळे खेळ खेळण्यासाठी उपस्थित राहतात व या उपस्थितीत सतत सुधारणा दिसून येत आहे विशेष अभिमानाची गोष्ट म्हणजे मंडळाच्या वतीने ह्याच मुला--मुलींची निवड जिल्हा व राज्यपातळीवरील स्पर्धासाठी झाली. आणि त्यासाठी आवश्यक तो खर्च करण्याचा निर्णय कार्यकारी समितीने घेतला. खेळाडू मुलां--मुलीमध्ये योग्य ती शिस्त व नियमितपणा ठेवण्याच्या दृष्टीनेही काळजी घेण्यात येते.

मंडळाच्या दैनंदिन कामकाजात व कारभारात सुधारणा साधण्याच्या हेतूने मंडळाच्या कचेरीत रोज संध्याकाळी दोन तास उपस्थित राहून हॉल बुक करणे, दैनंदिन हिशेब लिहिणे



व अन्य संबंधीत कामकाज पाहण्यासाठी एका लेखनिकाची नियुक्ती करण्याचा निर्णय समितीने घेतला. सुरुवातीला कार्यकारी समितीचे पदाधिकारी व सभासद डॉ. कुलकर्णी, सर्वश्री मयेकर, नावर, राणे व शेणॉय यानीच त्यांच्या निम्या वेतनाचा भार उचलला उरलेले निम्मे वेतन मेसर्स पी. नंदा कॅटरर्स ह्यांनी देण्याचे स्वखुषीने मान्य केले. या नियुक्तीमुळे मंडळाच्या दैनंदिन कामात चांगली सुधारणा दिसून आली. अल्प काळाच्या अनुभवानंतर त्यांच्या वेतनाचा कार्यकारी समितीचे पदाधिकारी व सभासद देत असलेला निम्मा हिस्सा मंडळानेच देण्याचा निर्णय घेण्यात आला या नियुक्तीमुळे मंडळाच्या आर्थिक उत्पन्नातही भर पडण्यास मदत झाली. मंडळाच्या मालमत्तेची देखभाल करण्यासाठी व मंडळाच्या अन्य कामकाजासाठी एक माळीही मंडळाच्या सेवेत आहे. ह्या दोघांच्याही वेतनांत वाढ देण्यांचा निर्णय कार्यकारी समितीने त्यांचे काम पाहून व महागाईची परिस्थिती लक्षात घेऊन घेतला.

मंडळाच्या आर्थिक उत्पन्नांत भर पडण्याच्या दृष्टीने तसेच परिसरांतील अन्य सभागृहांचे भाडयाचे दर लक्षांत घेऊन आंपल्या सभागृहाचे व अन्य सुविधांचे भाडे अल्प प्रमाणांत वाढविण्या निर्णय कार्यकारी समितीने पूर्ण विचारांती घेतला ह्या बरोबरच दुरुस्तीचे काम नवीन इले. वायरींगसह रंगाचे काम, पाण्याची सोय (नवीन टाकीसह) तसेच सभागृहातील अंतर्गत व्यवस्थेत बदल इत्यादी सुधारणा करून घेण्याचाही निर्णय कार्यकारी समितीने घेतला. ह्यासाठी मंडळास जरी बराच खर्च करावा लागला तरीसुद्धा मंडळाच्या वार्षिक उत्पन्नांत चांगलीच भर पडली हे १९८० ची हिशेब पत्रके पाहिल्यानंतर आपल्या ध्यानांत आले असेलच. ह्याच दृष्टीकोनातून कॅटरींग सर्व्हिसचे कॉन्ट्रॅक्ट मेसर्स पी. नंदा कॅटरर्स ह्यांना देण्याचा निर्णयही कार्यकारी समितीने घेतला. हा करार पाच वर्षासाठी करण्यात आला असून मंडळाकडे त्यांनी रु १५०००/–(पंधरा हजार) ची बिनव्याजी अनामत रक्कम ठेवलेली आहे मंडळास त्यांच्याकडून मिळावयाच्या कमिशनपोटी ही अनामत रक्कम वळती व्हावयाची आहे. ह्या व्यवस्थेमुळेही आर्थिक लाभाव्यतिरिक्त मंडळाच्या सभागृहात व खेळाच्या मैदानावर स्वच्छता व नियमीत देखभाल ह्या दृष्टीने चांगली सोय झाली.

मंडळाच्या मालमत्तेचा [ Property ] विमा उतरविण्यात आला असून कॅश इन् ट्रान्झिटचाही विमा उतरविण्यात आलेला आहे मंडळाच्या आर्थिक उत्पन्नात भर

घालण्याच्या हेतूने अनेक प्रकारे प्रयत्न करण्यात आले आणि यामुळे मंडळास उल्लेखनीय आर्थिक लाभ झाला. तसेच महाराष्ट्र स्पोर्टस् कौन्सिल यांच्याकडून अनुदान मिळविण्यासाठी केलेल्या प्रयत्नानासुद्धा यश आले हे नमूद करण्यास आम्हास आनंद होत आहे.

मंडळाचे विश्वस्त श्री. बालक ह्यांच्याकडून घेतलेले कर्ज रु. १९५३९/-- [ एकोणी हजार पांचशे एकूण चाळींस] आणि त्यावरील रु. ६७९०/-- ( सहा हजार सातशे नव्वद ) इतक्या व्याजासह त्यांना परत करण्यात आले. या शिवाय मंडळाची बाकी देणी पूर्णपणे देण्यात आली. सभासदाकडून घेतलेल्या बिनव्याजी अनामत रक्कमाही परत करण्यात आल्या.

कै. आचार्य अत्रे यांच्या स्मारकासाठी रु.१००/-[शंभर] ची देणगी देण्यात आली.

वसंत व्याख्यानमालेचा वार्षिक कार्यक्रम दिनांक १२।४।१९८० ते १८।४।१९८० पर्यंत झाला एकूण नऊ व्याख्यात्यांनी भाग घेऊन सहकार्य केले. वसंत व्याख्यानमालेचा हा कार्यक्रम सर्वसाधारणपणे समाधानकारक झाला. आर्थिक तूट टाळण्यासाठी कार्यक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये वाढ करण्याची सूचना समितीने स्विकारली नाही. या यां कार्यक्रमाचा मूळ उद्देश तसेच मंडळाच्या दृष्टिने असलेले त्याचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला. पुढील वर्षी हा कार्यक्रम आर्थिक दृष्ट्या तोट्याचा जाऊ नये म्हणून विशेष प्रयत्न करण्याचा निर्णय कार्यकारी समितीने घेतला.

मंडळाचे कार्य जनताभिमुख करण्याच्यां दृष्टीने वैद्यकीय सहाय्य शिबीरांसारखे कार्यक्रम मंडळाच्या वतीने घडवून आणण्याचा निर्णयही कार्यकारी समितीने घेतला.

नवीन बांधकाम योजनेच्या बाबतीत कार्यकारी समिती सतत प्रयत्नशील राहिली. वर्षभरात कार्यकारी समिती समोर अनेक प्रस्ताव आले परंतु मंडळाच्या हिताच्या दृष्टीने भावी काळांत कोणत्याही प्रकारची गुंतागुंत होऊ नये ह्या दृष्टीने तसेच अन्य तांत्रिक व कायदेशीर बाजू लक्षांत घेऊन कार्यकारी समिती कोणताही प्रस्ताव स्वीकारू शकली नाही.



याबाबतीत कार्यकारी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच समितीच्या सर्व सभासदांनी व अन्य काही सभासदांनीही सतत काळजीपूर्वक अभ्यास केल्यामुळे मंडळाच्या हिताच्या दृष्टीने नवीन बांधकाम योजनेच्या बाबतीत कोणत्या प्रकारचा प्रस्ताव स्वीकारणे योग्य होईल ह्याबाबतीत कार्यकारी समितीची भूमिका आता निश्चित झालेली आहे व त्या दृष्टीने एका चांगल्या प्रस्तावाचा विचार चालू आहे.

मंडळाच्या सर्व सभासदांशी संपर्क साधण्याच्या दृष्टीने दिपावलीच्या शुभप्रसंगी त्यांना सदिच्छा पत्रे पाठविण्याचा नवीन उपक्रम सुरु करण्याचा निर्णय कार्यकारी समितीने घेतला, त्याचा अपेक्षित परिणाम झाल्याचे दिसून आले. बऱ्याच सभासदांकडून ह्या उपक्रमाची प्रशंसा झाली.

मंडळाने श्री शेट्ये ह्यांच्या दाव्यांच्या बाबतींतील निकालाविरुद्ध केलेल्या अपिल केससंबंधी पुढील काहीही हालचाल झालेली नाही.

मंडळाच्या तीन वर्षांच्या काळातील कार्याचा हा त्रोटक अहवाल आपणास सर्वच दृष्टीने समाधानकारक वाटेल असे नाही. परंतु प्रामाणिक प्रयत्नांच्या बाबतीत आम्ही कसूर केली नाही हे जरी आपल्या लक्षात आले तरी आम्हास समाधान वाटेल. मंडळाच्या कार्यात आपणा सर्वांचे सतत सहकार्य लाभणे ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे हे आपण लक्षात घ्यावे ही विनंती. आपणा सर्वांचे तसेच मंडळाच्या अन्य हितचिंतकांचे, वसंत व्याख्यानमालेतील व्याख्यात्यांचे, मुंबईतील मराठी वर्तमानपत्रांचे, महाराष्ट्र स्पोर्टस् कौन्सिल, मुंबई महानगरपालिका, शिवाजी मंदिर , पोलीस आयुक्त, मुंबई, महाराष्ट्र शासन, ऑर्किटेक्ट श्री. हरचेकर ह्या सर्वांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मंडळाच्या वतीने मन पूर्वक आभार मानण्यात येत आहेत.

कार्यकारी समितीच्या संमतीने
आपला
**न. अ. मयेकर**
कार्यवाह